# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


**परिपत्रक क्र. २६४/२०२५**

**विषय:** पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरीकरिता मान्यताप्राप्त संशोधन केंद्र/संशोधक मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी मुदतवाढीबाबत ...

**संदर्भ:**
१. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १७९/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२४३६) दिनांक: ०७/०८/२०२४
२. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २६२/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/३४५३) दिनांक: २५/१०/२०२४
३. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १९५/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/१८६०) दिनांक: २३/०७/२०२५
४. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २००/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/१९१६) दिनांक: २८/०७/२०२५
५. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २१२/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२१४३) दिनांक: १४/०८/२०२५
६. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २१५/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२२२५) दिनांक: २३/०८/२०२५
७. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २७३/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२२८८) दिनांक: ०७/१०/२०२५

उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र. ४, ५ व ६ अन्वये पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरीचे आयोजन करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथील मान्यताप्राप्त संशोधक मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती ऑनलाईन पध्दतीने शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०२५ पर्यंत मागविण्यात आली होती.

तथापि, काही संशोधन मार्गदर्शकांकडील रिक्त जागांचा तपशील अद्ययावत करायच्या राहिल्या असल्याने जागा अद्ययावत करण्यास मुदतवाढ देणेबाबत त्यांचेकडून विनंती पत्रे या कार्यालयास प्राप्त झाली होती. तसेच उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र. ७ अन्वये पेट परीक्षेतून सुट मिळालेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग व मा. प्राचार्य/संचालक सर्व संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, संशोधक मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर प्रक्रिया पूर्ण करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. ०२०-७१५३३६३३ अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

संदर्भ: शै.प्रवेश/ 2616
दिनांक: 08/10/2025

**प्रत:**

| | |
|---|---|
| १. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे<br>२. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी. |

D:\PET 2024\Circulars.docx